क्र.अॅकब्यु/अे-३/प्रिंटर्स खरेदी/२०२५-२६/ २०२५ 17344
अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई, वरळी पोलीस कॅम्प,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०
दिनांक 28/07/2025

**विषय :- महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म,राज्य, मुंबई या कार्यालयातील प्रिंटर्स खरेदी करण्याबाबत**

******

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई मुख्यालय या कार्यालयाकरिता प्रिंटर्स खरेदी करणे आवश्यक असल्याने, अद्यावत असलेले **Cannon व HP** कंपनीचे **(Duplex)** असलेले प्रिंटर्स पुरविण्याकरिता इच्छुक पुरवठादार कंपनीकडून कमीत कमी दराची दरपत्रके मोहरबंद पाकीटामध्ये मागविण्यात येत आहेत. याबाबत अटी व शर्ती सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१. सिलबंद दरपत्रके दि.०६.०८.२०२५ रोजी कार्यालयीन वेळेमध्ये सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात जमा करावीत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाहीत.

२. मोहोरबंध लिफाप्यांवर प्रिंटर्स खरेदी असे लिहिणे आवश्यक आहे. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

३. दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

४. दरपत्रक मोहोरबंध लिफाफे उघडतेवेळी दरपत्रधारक स्वत: किंवा त्याचा एक प्रतिनिधी स्वखर्चाने उपस्थित राहू शकतो.

५. दरपत्रक कागदपत्रात कुठेही खाडाखोड/ ओव्हरराईटिंग (गिरवणे) पांढरी शाई लावणे टाळावे. चुकुन तसे करावे लागल्यास त्यावर पूर्ण स्वाक्षरी करावी.

६. दरपत्रक धारक कंपनीने या कार्यालयातील अधिकाऱ्यांबरोबर हितसंबंध नसल्याबाबत आणि एकच निविदा दिल्याबाबतचे हमीपत्र दरपत्रकासोबत दयावे.

७. कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार, हे कार्यालय राखून ठेवत आहे.

८. दरपत्रके दि. ०७/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर पोलीस अधीक्षक मुख्यालय यांचे दालनात उघडण्यात येतील.

९. दरपत्रके स्वीकारण्याबाबतचा अंतिम निर्णय या कार्यालयाचे विभाग प्रमुख यांचा राहिल.

अ.पो.अ. 28/7/25

**(अरुण पाटील)**
अपर पोलीस अधीक्षक (मुख्या-२)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
सर्व इच्छुक कंपन्या.

प्रत कार्यवाहीस्तव
पोलीस निरीक्षक, संगणक शाखा, लाप्रवि, म. राज्य, मुंबई.

२/- उपरोक्त पत्राची प्रत सोबत जोडली असून, सदरचे पत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे संकेतस्थळावर दि.०५/०८/२०२५ पर्यंत प्रसिध्दी राहील याप्रमाणे प्रसिध्द करण्यात यावे.